Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक ७ । पाने २।
DIGITAL EDITION



सूर्यकुमारसाठी वैयक्तिक कामगिरी महत्त्वाची!

(पान २ वर)

» Selected

### 1 मेपासून टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य

नवी दिल्ली : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना धमकी आल्या नंतर ते मराठी भाषे वरून चांगलेच आक्रमक झाले आहेत. एक मे, (महाराष्ट्र दिन) पासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. सरनाईक म्हणाले की, रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात.


नागरिकांच्या सुरक्षेसाठी तीन व्यापक SOP जाहीर

# राज्यात उष्णतेचा कहर वाढणार!

## यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर सरकारची मोठी तयारी

जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्यात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून आगामी काळात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. India Meteorological Department कडून अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून काही भागांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नागरिकांच्या संरक्षणासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती (SOP) जाहीर केल्या आहेत. राज्य उष्णता कृती आराखडा आणि IMD च्या रंग-कोडेड सतर्कतेच्या अनुषंगाने या SOP तयार करण्यात आल्या असून उष्णतेशी संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यावर मुख्य भर देण्यात आला आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री Girish Mahajan यांनी या उपाययोजनांमुळे विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. राज्यातील लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड या १५ उच्च-उष्णता जोखमीच्या जिल्ह्यांमध्ये या SOP ची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. पहिली SOP : बाहेर काम करणाऱ्या कामगारांसाठी संरक्षण पहिल्या SOP मध्ये रस्त्यावरील विक्रेते, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कर्मचारी आणि रिक्षाचालक यांच्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. IMD च्या पिवळ्या, केशरी





आणि लाल अलर्टनुसार कामाचे वेळापत्रक बदलणे, नियमित पाणी ब्रेक, पाणी बूथ उभारणे, ORS वाटप, सावलीची व्यवस्था आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यावर भर देण्यात आला आहे. दुसरी SOP ही चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी आहे. उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी थंड विश्रांती केंद्रे, शुद्ध पाण्याचा पुरवठा, वायुवीजन, कामाचे नियोजन, जॉब रोटेशन आणि उष्णता आजार ओळखण्यासाठी प्रशिक्षण यांचा समावेश आहे. महिला कामगारांसाठीही स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर आहे. तिसऱ्या SOP मध्ये उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण व वसाहती विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. यामध्ये कूल रूफ, हरित क्षेत्रे, वेंटिलेशन सुधारणा आणि हवामान-संवेदनशील नियोजन यांचा समावेश आहे. तात्काळ, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांद्वारे घरांची थर्मल क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तात्काळ उपायांमध्ये उष्णता जोखीम नकाशे, जनजागृती मोहीम, थंड केंद्रे आणि कमी खर्चातील घर सुधारणा यांचा समावेश आहे.

### अंमलबजावणीसाठी समन्वय यंत्रणा सज्ज

या SOP ची अंमलबजावणी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, म्हाडा, सिडको आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून केली जाणार आहे. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष (१०७७), रुग्णवाहिका (१०८) आणि पोलीस हेल्पलाईन (११२) यांसारख्या आपत्कालीन सेवांची माहितीही नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

# पुढील 48 तास धोक्याचे

## अनेक राज्यांना बसणार तडाखा



जन सम्राट टाईम्स

**जळगाव :**सध्या देशभरात उष्णतेची लाट पहायला मिळत आहे, मात्र पुन्हा एकदा जोरदार अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. पुढील 48 तासांमध्ये अनेक राज्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. देशभरात सध्या उष्णतेची लाट आल्याचं पहायला मिळत आहे. अनेक राज्यांमध्ये सरासरी तापमान हे 40 अंश सेल्सियसच्या वर पोहोचलं आहे. वाढत असलेलं तापमान उष्णतेच्या लाटेचा संकेत देत आहे.

मात्र गेल्या काही दिवसांपासून वातावरणात मोठा बदल जाणवत असून, विचित्र वातावरण अनुभवयाला मिळत आहे.भारतामधील काही राज्यांमध्ये उन्हाचा कडाका थोडा कमी झाला असून, त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र पुढील काही दिवस आता अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण स्कायमेटकडून पुन्हा एकदा जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, नव्या इशाऱ्यामुळे चिंता वाढली आहे. पुढील तीन ते चार दिवस अनेक राज्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. स्कायमेटच्या इशाऱ्यानुसार 17 एप्रिलपासून पुन्हा एकदा नवीन पश्चिमी विक्षोभ सक्रिय होत आहे. याचा मोठा परिणाम देशातील अनेक राज्यांवर होणार आहे. पुढील 24 तासांमध्ये अनेक राज्यांना अवकाळी पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. ज्यामध्ये अरुणाचल प्रदेश, आसाम, नागलँड, केरळ, अंदमान, निकोबार बेटं याठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रात सध्या पावसाचा कोणताही अंदाज वर्तवण्यात आलेला नाही, मात्र महाराष्ट्रात पुढील काही दिवस उष्णतेची लाट पहायला मिळण्याची शक्यता आहे. विषेत: मराठवाड्यात उष्णतेचा चांगलाच कडका जाणवण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रासोबत गुजरात, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांना देखील उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

### मान्सूनच आगमन कधी होणार?

यंदा देखील गेल्या वर्षीप्रमाणेच देशासह राज्यात वेळेआधीच मान्सूची एन्ट्री होण्याची शक्यता आहे. गेल्यावर्षी वेळेआधीच मान्सून दाखल झाला होता. यंदा जूनमध्ये मान्सूनची एन्ट्री होण्याची शक्यता आहे. मात्र यावेळी मान्सूनवर अल निनोचं संकट घोंगावत आहे, त्यामुळे पावसाचं प्रमाण कमी राहण्याचा अंदाज सध्या वर्तवण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# शिंदे गटात मोठी उलथापालथ

## तडकाफडकी निर्णय; काय घडतंय?

जन सम्राट टाईम्स



**सोलापूर :** राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी सोलापूर, माढा लोकसभेची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्याचे आदेश दिले आहे, त्यामुळे या दोन्ही लोकसभेतील सर्व निवडी रद्द करण्यात आल्या आहेत. यामुळे या दोन्ही मतदार संघात खळबळ उडाली आहे. काल खासदार श्रीकांत शिंदे यांनी या दोन्ही मतदारसंघात आढावा बैठक घेतली होती. त्यानंतर आज तडकाफडकी जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे.


याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. शिवसेनेची कार्यकारिणी बरखास्त शिवसेनेची सोलापूर, माढा लोकसभेची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. जिल्हा कार्यकारणी सोबतच महिला आघाडी, युवासेना आणि इतर प्रकोष्ट रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे आता सोलापूर आणि माढा लोकसभेतील जिल्हाप्रमुख ते शाखाप्रमुखापर्यंतच्या सर्व निवडी रद्द झाल्या आहेत. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर ही कार्यकारणी बरखास्त करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. आढावा बैठकीनंतर निर्णय काल शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी सोलापुरात आढावा बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये काही पदाधिकाऱ्यांनी गैरवर्तन केले होते, त्यामुळे श्रीकांत शिंदे संतापले देखील होते. त्यानंतर अखेर आज जिल्ह्यातील सर्वच कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आहे. यामुळे आता आगामी काळात या दोन्ही मतदारसंघांना नवी कार्यकारिणी मिळण्याची शक्यता आहे. यामुळे या ठिकाणी आता शिवसेनेची धुरा नवीन पदाधिकाऱ्यांच्या खांद्यावर दिली जाण्याची शक्यता आहे.

### कामाबाबत आढावा

काल खासदार श्रीकांत शिंदे यांनी आढावा बैठक घेतली होती. याबाबत बोलताना श्रीकांत शिंदे यांनी, 'सोलापूर, धाराशिव, माढा या लोकसभाचा आढाव आम्ही या बैठकीत घेत आहे. शिंदे साहेबांच्या आदेशाने संपर्क प्रमुख नेमण्यात आलेले आहेत, ते सर्व जबाबदारी पार पाडत आहेत. आम्ही लोकसभा निहाय आढावा घेतोय यानंतर अगदी वार्ड निहाय देखील आढावा घेतला जाईल.

# निर्यातीअभावी उन्हाळी कांद्याचे दर गडगडले

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** आखाती युद्धामुळे विस्कळीत झालेली कांदा निर्यात आणि बिगर आखाती देशांतून फारशी मागणी नसल्यामुळे निर्यातक्षम उन्हाळी कांद्याचे दर निम्म्यावर आले आहेत. निर्यातक्षम कांद्याला सरासरी २००० ते २५०० रुपये प्रति क्विंटल दर अपेक्षित असताना नाशिकमधील प्रमुख बाजार समित्यांमध्ये जेमतेम ९०० ते १३०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. नाशिक मधील कांदा उत्पादक पट्ट्यातील उन्हाळी काद्यांची काढणी वेगाने सुरू आहे, महिनाअखेर काढणी पूर्ण होईल. ऐन काढणीच्या वेळेत उन्हाळी पावसाचा कांद्याला फटका बसला. शेतशिवारात काढलेला कांदा पावसात भिजला. हे नुकसान कमी म्हणून निर्यातक्षम कांदा निर्याती अभावी मातीमोल ठरत आहे. नाशिक परिसरात उत्पादित झालेल्या निर्यातक्षम उन्हाळी कांद्याला सरासरी २००० ते २५०० रुपये प्रति क्विंटल दर मिळतो. पण, यंदा निर्यात विस्कळीत झाल्यामुळे दर्जेदार कांद्याला जेमतेम ९०० ते १३०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे.

नाशिक बाजार समितीत सोमवारी, १३ एप्रिल रोजी उन्हाळी कांद्याला सरासरी ८११ रुपये प्रति क्विंटल, लासलगावमध्ये सरासरी ११५० रुपये, जळगावात सरासरी ९०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. दर्जेदार कांद्यालाही १३०० रुपयांहून जास्त दर मिळत नसल्याची स्थिती आहे. लाल कांद्याचे दर ५०० रुपये क्विंटलवर आहेत.युद्धामुळे आखाती देशांमध्ये उपजिविकेसाठी गेलेल्या लोकं आपआपल्या देशांत माघारी आली आहेत. उपजिविकेसाठी आखातात वास्तव्यास असलेली लोकसंख्या मोठी आहे. शिवाय अद्यापही होर्मुजची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी खुली नाही, त्यामुळे आखाती देशांना फारशी निर्यात होत नाही. सध्या श्रीलंका, थायलंड, मलेशिया, सिंगापूरला कांद्याची निर्यात होत आहे. युरोपीय देशांना अद्याप निर्यात सुरू झालेली नाही. मे महिन्यापर्यंत निर्यातीला गती येईल. युद्धजन्य स्थितीमुळे वाहतूक खर्चात वाढ झाली आहे.

# सत्य प्रखरतेने समोर येईलच : रुपाली चाकणकर

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण बाहेर आल्यानंतर रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. तसेच पक्षाअंतर्गत आणि विरोधकांकडून दबाव वाढू लागल्यानंतर त्यांना पक्षाच्या महिला संघटनेचे प्रमुखपदही सोडावे लागले. या प्रकरणात सातत्याने राजकीय वर्तुळातून आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. या दरम्यान काही दिवसांपूर्वी बीडमधून एक निनावी पत्र पोलिस प्रशासनाला मिळाले होते. या पत्रात महिला आयोगाच्या कार्यालयाचा उल्लेख करत गंभीर आरोप करण्यात आले होते. यानंतर रुपाली चाकणकर यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या आपली भूमिका मांडली आहे.

चाकणकर नेमकं काय म्हणाल्या?

"महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात आजतागायत अनेकांवर आरोप झाले, त्या आरोपांचे पुरावे माध्यमांनी सबंध महाराष्ट्राला दाखवले व आरोप करणाऱ्यांनीही पुराव्यानिशी आरोप केले.

मात्र आज २८ दिवस होत आहेत, माझ्यावर व माझ्या परिवारावर बेछूट व कपोलकल्पित आरोप हे फक्त हेतूपुरस्सर व बदनाम करण्यासाठी होत आहेत, हे वेळोवेळी समोर येत आहे. निनावी पत्राच्या मागे कोण आहे? असा प्रश्नही पुढे चाकणकर यांनी उपस्थित केला आहे. त्या म्हणाल्या की, "तसेच, निनावी पत्राबाबत जे कोणी आरोप करणारे आहेत त्यांनी सांगावे की ते पत्र त्यांच्यापर्यंत कसे आले?

# महिला आरक्षणाच्या आडून मतदारसंघ फेररचना

## विरोधकांचा आरोप; विधेयके मंजुरीसाठी पंतप्रधानांचे सहकार्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना एकतृतीयांश प्रतिनिधित्व देणारा नारीशक्ती वंदन कायदा लागू करण्यासाठी केंद्र सरकारने राज्यघटनेतील तीन दुरुस्त्यांसाठी विधेयके आणली आहेत. मात्र, महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचा घाट घालण्यात आल्याचा आरोप करत काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्षांनी या विधेयकांना आक्षेप घेतला आहे. संसदेच्या गुरुवारपासून सुरू होत असलेल्या तीनदिवसीय विशेष अधिवेशनात ही विधेयके मांडण्यात येणार आहेत. ही एकमताने संमत करण्याची विनंती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना पत्राद्वारे केली आहे. या तीनही दुरुस्त्यांची विधेयके एकत्रितपणे १६ एप्रिल रोजी सुरू होणाऱ्या तीन दिवसांच्या संसदेच्या अधिवेशनामध्ये मांडले जाणार आहेत. त्यासाठी सत्ताधारी भाजपने तिन्ही दिवसांसाठी दोन्ही सदनांतील सदस्यांसाठी व्हीप जारी केला आहे. महिला आरक्षणाला काँग्रेससह इतर 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांचा विरोध नसला तरी, लोकसभेच्या मतदारसंघांच्या फेररचनेवर तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. या 'पॅकेज' दुरुस्ती विधेयकांसंदर्भात भूमिका घेण्यासाठी काँग्रेसचे अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीच्या



नेत्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. त्यामध्ये 'आप'देखील सहभागी होण्याची शक्यता आहे. २०२३ मध्ये मंजूर झालेल्या नारीशक्ती वंदन कायद्यानुसार, लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण ठेवण्यात आले आहे. तसेच, त्याअंतर्गत अनुसूचित जाती व जमातींसाठीही राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, ओबीसींसाठी कोट्याअंतर्गत कोटा देण्याची तरतूद नाही. महिला आरक्षणामध्ये ओबीसींसाठीही कोटा निश्चित करण्याची मागणी विरोधकांकडून होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, त्याबाबत 'इंडिया' आघाडीच्या बैठकीनंतरच निर्णय घेतला जाणार असल्याचे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. काँग्रेस, आप, राष्ट्रीय जनता दल, द्रमुक, समाजवादी पक्ष आदींनी २०२७ मध्ये नवी जनगणना झाल्यानंतर मतदारसंघांची फेररचना केली जावी, अशी मागणी केली आहे.तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी मतदारसंघांच्या फेररचनेला विरोध केला असून दक्षिणेकडील राज्यांचे निवडणुकीतील प्रतिनिधित्व कमी करण्यासाठी केंद्राने रचलेले हे राजकीय कारस्थान आहे, अशी टीका केली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# राज्याची वाटचाल 'उडता पंजाब'च्या दिशेने?

## नेस्को प्रकरणानंतर पुन्हा प्रश्नचिन्ह, राज्यभरात कारवाया वाढल्या

जन सम्राट टाईम्स



मुंबई- : राज्यात अंमली पदार्थांच्या वाढत्या तस्करी आणि सेवनाच्या घटनांमुळे परिस्थिती गंभीर बनत असून, राज्याची वाटचाल 'उडता पंजाब'सारख्या धोकादायक दिशेने होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. गोरेगाव येथील NESCO Exhibition Centre येथे झालेल्या संगीत कार्यक्रमात दोन तरुणांचा अंमली पदार्थांच्या अति सेवनामुळे मृत्यू झाल्याची घटना समोर आल्यानंतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. दहा वर्षांपूर्वी देशात सर्वाधिक अंमली पदार्थांची तस्करी पंजाबमध्ये होत होती. त्या काळात दरवर्षी आठ ते दहा हजार प्रकरणे नोंदवली जात होती. सध्या महाराष्ट्रात ही संख्या तीन ते चार हजारांच्या दरम्यान पोहोचली असून, वाढत्या घटनांनी प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. मुंबई शहर अंमली पदार्थ तस्करीचे प्रमुख केंद्र बनत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. त्यानंतर पुणे, विशेषतः आयटी क्षेत्रात, अंमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढले आहे. याशिवाय नाशिक, संभाजीनगर, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांबरोबरच अमरावती, अकोला आणि नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातही अंमली पदार्थांचे जाळे विस्तारत असल्याचे दिसून येत आहे. राज्य पोलिस आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाने 2024 मध्ये मोठ्या प्रमाणात कारवाया करत तब्बल 4 हजार 249 कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले होते. त्या वर्षी 14 हजार 230 आरोपींना अटक करण्यात आली होती. 2025 मध्ये ही संख्या वाढून 15 हजार 933 वर पोहोचली. आतापर्यंत साडेसात हजार कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

### पुण्यात वाढती व्यसनाधीनता

मुख्यमंत्री यांनी या वाढत्या तस्करीचा गंभीरपणे विचार करून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईसाठी NDPS Act अंतर्गत मकोका लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच तस्करांची संपत्ती जप्त करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान तस्करीला मदत करणाऱ्या 17 पोलिस कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिकांना अटक करून त्यांना देशाबाहेर हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे.

# अकोला पुन्हा एकदा सर्वात 'हॉट'; ४४ अंशांचा टप्पा गाठला!

जन सम्राट टाईम्स

अकोला : उन्हाचा पारा चांगलाच वाढत असतांना अकोला शहर पुन्हा एकदा सर्वात 'हॉट' ठरले आहे. एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातच अकोला शहराने ४४ अं.से.चा टप्पा गाठला. कालच ४३.८ अं.से. तापमानासह अकोला जगात सर्वाधिक तापमानाचे शहर ठरले होते. आज तापमानात आणखी वाढ नोंदवल्या गेली. दरवर्षी उन्हाळ्यात अकोला जिल्ह्याला तप्त उन्हाचे चटके बसत असतात. उन्हाळ्यात जिल्ह्यातील तापमानात कमालीची वाढ होते. जिल्ह्यात दरवर्षी तापमानाचे नवनवे विक्रम रचले जातात. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला ढगाळ वातावरण होते. वातावरणात बदल झाला होता. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून तप्त उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली. उन्हाच्या तीव्र लाटेत होरपळ होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून अकोला देशातील सर्वात उष्ण शहर ठरले. त्यानंतर आज अकोला शहरातील तापमानाने ४४ अं.से.चा टप्पा देखील गाठला. नागपूर येथील हवामान विभागाने नोंदवलेल्या तापमानानुसार विदर्भात अकोला पुन्हा एकदा सर्वाधिक तापमानाचे शहर ठरले आहे.विदर्भातील अकोल्यासह सर्वच शहरांचे तापमान ४१ अं.से. च्या पार गेले आहे. यामध्ये अकोला ४४, अमरावती ४३.८, बुलढाणा ४१.६, चंद्रपूर ४२.२, गडचिरोली ४२.६, गोंदिया ४१.१, नागपूर ४२.२, वर्धा ४३.५, वाशीम ४२.५ आणि यवतमाळ जिल्ह्यात ४२.६ अं.से. तापमानाची नोंद १४ एप्रिलला झाली आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने १७ एप्रिलपर्यंत अकोला तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. उन्हात वाहने शक्यतो चालवू नये. ज्वलनशील पदार्थांपासून शक्यतो दूर राहावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.

Selected

## नवविवाहितेचा १२ व्या दिवशीच मृत्यू

सातारा : अवघ्या १२ दिवसांपूर्वी प्रेमविवाह केलेल्या नवविवाहितेचा मृत्यू झाल्याने साताऱ्यात मंगळवारी खळबळ उडाली. मुलीच्या कुटुंबीयांनी घातपातातून तिचा मृत्यू झाल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल केली आहे. रात्री उशिरा या प्रकरणी पतीविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता. भाग्यश्री संजय मोटे असे मृत्यू झालेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत प्राथमिक माहिती अशी, भाग्यश्री ३० मार्च रोजी बेपत्ता झाली होती. या घटनेनंतर त्याच दिवशी राजकुमार लालासो कांबळे (२५, मूळ रा. पुळकोटी, ता. माण, जि. सातारा सध्या रा. विकासनगर, सातारा)- याच्यासोबत भाग्यश्रीचा विवाह झाल्याचे मोटे कुटुंबीयांना समजले. यानंतर राजकुमार कांबळे व मोटे कुटुंबीयांची चर्चा झाली. या चर्चेमध्ये कांबळे कुटुंबीयांनी हुंडा मागितल्याचा आरोप मोटे कुटुंबीयांनी आपल्या तक्रारीत केला आहे.

# बाबासाहेबांचे विचारच समाजपरिवर्तनाची खरी ताकद" - युवा नेते प्रतापराव पाटील

## पाळधी व पिंप्री येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

जन सम्राट टाईम्स



**पाळधी/पिंप्री** : "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली राज्यघटना ही देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क आणि न्याय देणारी आहे. त्यांच्या विचारांमुळे समाजात शिक्षण, समानता आणि बंधुता यांचे महत्त्व रुजले आहे. बाबासाहेबांचे विचारच समाजपरिवर्तनाची खरी ताकद असून, आजच्या तरुणांनी त्यांचा वारसा पुढे नेणे ही काळाची गरज आहे. शिक्षण हाच खरा बदलाचा मार्ग असून, त्याद्वारेच समाजाची प्रगती शक्य असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य तथा युवा नेते प्रतापराव पाटील यांनी केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाळधी व पिंप्री परिसरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात युवा नेते प्रतापराव पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर बुद्ध वंदना पंचशील ग्रहण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैतन्य नन्नवरे यांनी केले. प्रास्ताविकात माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे यांनी जयंतीचे महत्त्व विशद केले, तर आभार प्रदर्शन माजी सरपंच चंद्रमणी ननवरे यांनी मानले. या कार्यक्रमास माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, पाळधी येथील सरपंच विजय पाटील, शरद कोळी, उद्योगपती शरद कासट, अनिल कासट, अरविंद मानकरी, सुरेश नन्नवरे, बाळू नन्नवरे, माजी जि.प. सदस्य श्रीकृष्ण साळुंखे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय पाटील, माजी उपसरपंच मच्छिंद्र साळुंखे, चंदन कळमकर, उद्योजक दिलीप बापू पाटील, माजी सरपंच हेमंत पाटील, युवा सेना व तालुकाप्रमुख अमोल पाटील, उद्योजक प्रसाद शिंदे माळी, महासंघ जिल्हाध्यक्ष अनिल माळी, पत्रकार भगवान मराठे, दिगंबर माळी, पप्पू माळी, महेश शिंपी, उपसरपंच शरीफ देशपांडे, महेश शिंपी, भूषण महाजन, चंदू माळी यांच्यासह समाजबांधव, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यांनी घेतले परिश्रम

कार्यक्रम यशस्वीसाठी उत्सव समितीचे डॉ. गौतम नन्नवरे, विजय सपकाळे, सुरेश नन्नवरे, दिलीप नन्नवरे, सुभाष नन्नवरे, शैलेश नन्नवरे, कैलास नन्नवरे, मुकेश सोनवणे, उत्सव समितीचे प्रमुख मार्गदर्शक प्रणय नन्नवरे, अध्यक्ष आशिष सोनवणे, दीपक जाधव, पंकज नन्नवरे, श्याम नन्नवरे, सचिन नन्नवरे, कृष्णा नन्नवरे व दादू ननवरे उत्सव समितीचे सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# आरक्षण संपवण्याचा डाव

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

जन सम्राट टाईम्स




**मुंबई** : अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे करण्यात येणारे उपवर्गीकरण अशास्त्रीय पद्धतीने रेटले जात असून यामागे आरक्षणाचे मूळ उद्दीष्ट संपवण्याचे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र आहे, असा आरोप करत याप्रकरणी सरकारने जपून पावले टाकीवीत, समाजात मोठी खदखद आहे, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे. अनुसूचित जाती- जमातीच्या आरक्षणाला हात लावण्याचा राज्यांना अधिकार नाही, तो संसदेचा अधिकार आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात राज्यांना मुभा दिली. महायुती सरकारने याप्रकरणी न्या. बदर समिती नेमली, त्या समितीने समाजातल्या कोणत्याही घटकांशी चर्चा केली नाही. समितीचा अहवाल सार्वजनिक नाही. आणि त्यावर निवेदन मागवली आहेत. आंबेडकर जयंती मध्ये समाज मग्न असताना सरकार उपवर्गीकरण पुढे रेटत आहे, असा आरोप आंबेडकर यांनी केला. कर्नाटक राज्यात उपवर्गीकरण करताना शास्त्रीय व संविधानिक पद्धती अवलंबली होती. तसा प्रयत्न महाराष्ट्रात होत नाही. उपवर्गीकरणाविषयी दुमत नाही, मात्र पद्धती चुकीची आहे. सरकारने न्या. बदर समितीचा अहवाल जाहीर करावा. उप वर्गीकरणाचा आधार व पद्धती सांगा. आपण याप्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत. याप्रकरणी आंबेडकरी समाजात खदखद आहे. ती कधीही बाहेर पडू शकते. सामाजिक तणाव वाढू नये यासाठी सरकारने सावध पावले टाकवीत, असा इशारा आंबेडकर यांनी दिला.

### घटनात्मक पेच निर्माण

महायुती सरकारकडून केले जाणारे उपवर्गीकरण बेकायदेशीर असून यामुळे कायदेशीर आणि घटनात्मक पेच निर्माण होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने उप-वर्गीकरणाचा अधिकार राज्य सरकारांना दिला असला तरी मूळ सूचीमध्ये बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच आहे. राज्य सरकारांना हा अधिकार मिळाल्यास आरक्षणाचे राजकीयकरण होईल आणि आरक्षणाच्या मूळ हेतूला तडा जाईल.

# गॅस पाईपलाईनची सक्ती थांबवा; रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के.)ची मागणी

जन सम्राट टाईम्स



मुंबई : वीज बिलातील कथित गोंधळ, वाढती दरवाढ आणि गॅस पाईपलाईनची सक्ती याविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के.)ने आवाज उठवला आहे. पक्षाचे अध्यक्ष राजाराम खरात यांनी यासंदर्भात निवेदन देत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे। निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) कडून येणाऱ्या वीज बिलांमध्ये विविध आकारांची गुंतागुंत असल्याने सामान्य नागरिक हैराण होत आहेत. स्थिर आकार, वहन आकार, इंधन समायोजन, कर आणि इतर शुल्कांमुळे बिल समजणे कठीण होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे वीज बिल साधे, स्पष्ट आणि पारदर्शक पद्धतीने देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे। तसेच, जबरदस्तीने नवीन वीज मीटर बसविणे थांबवावे आणि ग्राहकांना त्याबाबत योग्य माहिती देऊनच निर्णय घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे। गॅस संदर्भातही नागरिकांमध्ये अस्वस्थता असल्याचे सांगण्यात आले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# १२ अग्निशमन जवानांना राष्ट्रपती पदके!

## अग्नीशमन सप्ताहका पाळण्यात येतो ?

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त मंगळवारी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकभवन मुंबई येथे अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई अग्निशमन दल, एमआयडीसी व महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील १२ अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेली राष्ट्रपती पदके समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली. अग्निशमन सेवा केवळ आग विझविण्यापुरती मर्यादित राहिलेली नसून महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा, औद्योगिक संपत्ती आणि सार्वजनिक ठिकाणांचे संरक्षण करणे ही जबाबदारी झाली आहे. स्वयंपाक वायू व रासायनिक आगी, तसेच ई-कार्स आणि इतर विद्युत उपकरणांमधील लिथियम-आयन बॅटरी मुळे आगींच्या घटना घडत आहेत. आग प्रतिबंध, शोध आणि कारणांचे विश्लेषण आदी क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे. बदलत्या परिस्थितीत अग्निशमन कर्मचाऱ्यांचे कौशल्य वर्धन, प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा सातत्याने अद्ययावत करणे गरजेचे आहे, असे राज्यापाल यांनी सांगितले.

महाराष्ट्रात अग्निशमन सेवांच्या आधुनिकीकरणासाठी १५व्या वित्त आयोगांतर्गत ६१४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी शहरी तसेच ग्रामीण भागात प्रभावी अग्निसुरक्षा सेवा पुरविण्यास निश्चितच मदत करेल, असे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात अग्निविज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्थेची स्थापना करणे अथवा विद्यमान संस्थांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना अग्निसुरक्षा सराव, जनजागृती मोहिमा आणि आपत्ती व्यवस्थापन उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### अग्निशमन ध्वजाचे तिकीट

राजगड तालुक्यावर शोककळा पसरली असून दोन्ही भावांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. सुरुवातीला महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या जॅकेटला अग्निशमन ध्वजाचे तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले.

# किशनचा धडाका, हिंगेचा विश्वविक्रमी पदार्पण; हैदराबादची राजस्थानवर मात

जन सम्राट टाईम्स



मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील २१व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सवर ५७ धावांनी दणदणीत विजय मिळवत स्पर्धेत दमदार पुनरागमन केले. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, हैदराबाद येथे झालेल्या या उच्च धावसंख्येच्या सामन्यात हैदराबादने २० षटकांत २१६/६ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात राजस्थानचा डाव १९ षटकांत १५९ धावांवर आटोपला. इशान किशनच्या झंझावाती फलंदाजीने आणि प्रफुल हिंगेच्या विश्वविक्रमी पदार्पणाने सामन्याचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला.


हैदराबादची सुरुवात धक्कादायक झाली. अभिषेक शर्मा पहिल्याच चेंडूवर बाद झाला. मात्र त्यानंतर ट्रॅव्हिस हेडने १८ धावा करत डाव सावरला आणि इशान किशनने अवघ्या ४४ चेंडूत ९१ धावांची स्फोटक खेळी साकारत राजस्थानच्या गोलंदाजांवर सातत्याने दबाव ठेवला. दुसऱ्या टोकाला हेन्रिख क्लासेनने २६ चेंडूत ४० धावांची प्रभावी साथ दिली. किशन–क्लासेन यांची निर्णायक भागीदारी हा डावाचा खरा कणा ठरली. याच भागीदारीमुळे हैदराबादने २१० चा टप्पा सहज ओलांडला. शेवटच्या षटकांत सलिल अरोराने १३ चेंडूत २४ नाबाद धावा करत डावाला वेगवान फिनिश दिला. राजस्थानकडून जोफ्रा आर्चरने ४ षटकांत ३७ धावांत २ बळी घेत सुरुवातीला प्रभाव टाकला. संदीप शर्मानेही महत्त्वाचा बळी घेत काहीसा ब्रेक लावला. मात्र सामन्याचा पहिला टर्निंग पॉइंट १७व्या षटकात दिसला. त्या षटकात किशनने सलग मोठे फटके खेचत धावगती अचानक वाढवली. शेवटच्या चार षटकांत उभारलेल्या अतिरिक्त ५० पेक्षा अधिक धावा अखेरीस निर्णायक ठरल्या.

२१७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना राजस्थानची सुरुवात पूर्णपणे कोलमडली. प्रफुल हिंगेने पदार्पणाच्या पहिल्याच षटकात ३ बळी घेत राजस्थानच्या वरच्या फळीला जबर धक्का दिला. हा सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट ठरला. डोनोव्हन फरेराने ४४ चेंडूत ६९ धावांची झुंजार खेळी करत लढा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या टोकाला रविंद्र जाडेजाने ३२ चेंडूत ४५ धावा करत साथ दिली. फरेरा–जाडेजा यांची भागीदारी काही काळ आशादायक वाटत होती, पण आवश्यक धावगती सातत्याने वाढत गेल्याने दबाव राजस्थानवरच राहिला. सामन्याचा दुसरा निर्णायक टप्पा १४व्या षटकात दिसला. त्या षटकात साकीब हुसेनने सलग दोन विकेट्स घेत राजस्थानचा कणा मोडला. त्या दोन विकेट्सनंतर राजस्थानची उरलेली आशाही जवळपास संपुष्टात आली. त्याच्या ४ षटकांत २४ धावांत ४ बळी या भेदक स्पेलने विजयावर शिक्कामोर्तब केले. हिंगेनेही ४/३४ अशी विक्रमी कामगिरी नोंदवत पदार्पण संस्मरणीय केले. या सामन्यात अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. प्रफुल हिंगे आयपीएल इतिहासात पदार्पणाच्या पहिल्याच षटकात ३ बळी घेणारा पहिला गोलंदाज ठरला. इशान किशनची ४४ चेंडूत ९१ धावांची खेळी या मोसमातील सर्वात प्रभावी डावांपैकी एक मानली जात आहे. हैदराबादचा ५७ धावांचा हा विजय नेट रनरेटच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा ठरला. राजस्थानचा सलग विजयाचा आलेख या सामन्याने खंडित केला. या विजयाने सनरायझर्स हैदराबादचा आत्मविश्वास निश्चितच उंचावला आहे. पुढील २२व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स ही लढत एम. ए. चिदंबरम स्टेडियम, चेपॉक, चेन्नई येथे रंगणार आहे.

# पॅकेज द्या नाहीतर कोरोनाप्रमाणे उलटे स्थलांतर होईल

## मालेगावतील भीषण वास्तव 'या' पक्षाने आणले समोर

जन सम्राट टाईम्स




मुंबई : पश्चिम आशियामध्ये सुरु असलेल्या युद्धामुळे भारताची वस्त्रोद्योग उत्पादनांची निर्यात ठप्प झाली असून कापूस आणि सूत या कच्चा मालाचे दर वाढल्याने आठवड्यातील तीन दिवस या व्यवसायात टाळेबंदी आली आहे. त्यामुळे या व्यवसायाला वाचवण्यासाठी राज्यातील महायुती सरकारने विशेष आर्थिक पॅकेज द्यावे, अशी मागणी भिवंडी पूर्वचे समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांना वस्त्रोद्योग व्यवसायाला तातडीने विशेष आर्थिक पॅकेजे देण्यसंदर्भात आमदार रईस शेख यांनी नुकतेच पत्र लिहिले आहे. यासंदर्भात बोलताना आमदार रईस शेख म्हणाले की, मार्च २०२६ या एका महिन्यात राज्यातील वस्त्रोद्योग व्यवसायाला तब्बल ४ हजार कोटींचा फटका बसल्याचे राज्य वस्त्रोद्योग महामंडळाने केलेल्या पाहणीतून स्पष्ट झाले आहे. राज्यात ९ लाख ४८ हजार यंत्रमाग आणि ४ हजार हातमाग आहेत. देशातील यंत्रमागापैकी ३९ टक्के यंत्रमाग केवळ महाराष्ट्र या एका राज्यात आहेत.

# सूर्यकुमारसाठी वैयक्तिक कामगिरी महत्त्वाची!

## सूर्यकुमारचे स्थान वैयक्तिक कामगिरीवर अवलंबून

जन सम्राट टाईम्स



मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : भारताच्या ट्वेन्टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नावापुढे विश्वचषक विजेता कर्णधार असे बिरुद असले, तरी त्याचे भारतीय संघातील स्थान निश्चितपणे त्याच्या वैयक्तिक कामगिरीवर अवलंबून राहील असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळेच २०२८ लॉस एंजिलिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्याच्या समावेशाविषयी निश्चितपणे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्याचवेळी आगामी आयर्लंड दौऱ्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीला स्थान देण्यात आले आहे. यावर्षी जून-जुलैमध्ये होणारा भारताचा इंग्लंड आणि आयर्लंड दौरा कर्णधार सूर्यकुमारसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. कारण या वेळी त्याच्या नेतृत्वापेक्षा त्याच्या फलंदाजीची अधिक कडक छाननी केली जाईल असेच मानले जात आहे. दोन वर्षांनी २०२८ मध्ये होणारे ऑलिम्पिक आणि ऑस्ट्रेलियातील ट्वेन्टी-२० विश्वचषक यांसारख्या मोठ्या स्पर्धांच्या पुढील टप्प्यापर्यंत त्याला आणखी दोन वर्षे संधी द्यायची की नाही, याचा निर्णय या दौऱ्यातील कामगिरीवरून घेतला जाऊ शकतो. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सूर्यकुमारलाच अजूनही पहिली पसंती दिली आहे. गंभीर यांचा कार्यकाळ २०२८ च्या ट्वेन्टी-२० विश्वचषकापर्यंत वाढवला जाण्याची शक्यता आहे. मात्र, अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती गंभीर यांच्या मताशी सहमत होईल का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. कारण ऑलिम्पिकच्या वेळी सूर्यकुमार ३८ वर्षांचा असेल. सूर्यकुमार सध्या संघाचे नेतृत्व करत असला तरी, एक फलंदाज म्हणून त्याला त्याच्या कामगिरीत सातत्य राखणे आवश्यक आहे. तो इंग्लंड दौऱ्यावर नक्कीच नेतृत्व करेल, परंतु त्यानंतर २०२८ पर्यंतच्या पुढील चर्चा केवळ त्याच्या वैयक्तिक कामगिरीवर आधारित असतील, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील (बीसीसीआय) एका अधिकाऱ्याने नाव न देण्याच्या अटीवर सांगितले. सूर्यकुमारसाठी २०२५ हे वर्ष अत्यंत खराब राहिले होते, त्याचा स्ट्राईक रेट १२० पेक्षा कमी झाला होता आणि त्याला एकही अर्धशतक झळकावता आले नव्हते. चालू वर्षांत हे चित्र बदलले आणि त्याने ट्वेन्टी-२० विश्वचषकापर्यंत १६० पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने चार अर्धशतके ठोकली. मात्र, ट्वेन्टी-२० विश्वचषकात अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्याचा अपवाद वगळता सूर्यकुमारला कोणतीही उल्लेखनीय कामगिरी करता आली नाही.

### अडचण कुठे

भारतीय संघात पहिल्या तीन क्रमांकावर स्फोटक फलंदाजांची फौज आहे. अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, इशान किशन हे चांगल्या लयीत खेळत आहेत. त्याचवेळी वैभव सूर्यवंशीसारखा युवा खेळाडू संधीच्या प्रतीक्षेत आहे. सूर्यकुमारसाठी हीच सर्वात अडचणीची बाब आहे. अशा स्थितीत संघात स्वत:चे स्थान टिकवून ठेवण्यासाठी सूर्यकुमारला सातत्यपूर्ण कामगिरी करणे गरजेचे आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेत नव्या सदस्यांचा प्रवेश

## ग्राहक संरक्षण संस्थेत संघटन बळकटीसाठी नवा टप्पा

जन सम्राट टाईम्स




मुंबई : दक्षिण मध्य मुंबई जिल्ह्यात लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या कार्याला नवी उभारी मिळत असून, नव्या सदस्यांच्या प्रवेशामुळे संघटन अधिक बळकट होत आहे. सचिव सौ. लक्ष्मी कवळे यांच्या नेतृत्वाखाली सौ. सोनाली कार्तिक सोनवणे आणि सौ. प्रेमला तानाजी कुंभार यांनी संस्थेचे प्राथमिक सदस्यत्व स्वीकारले. या प्रवेशामुळे ग्राहक हक्क संरक्षणाच्या चळवळीला नवे बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण, जनजागृती आणि कायदेशीर मार्गदर्शन यासाठी सातत्याने कार्य केले जाते. नव्याने सहभागी झालेल्या सदस्यांनीही या उद्दिष्टांसाठी सक्रिय भूमिका निभावण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रसंगी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय दिनकर आमकर साहेब यांच्या मार्गदर्शनाचा विशेष उल्लेख करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्य देशभर विस्तारत असून, ग्राहक संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. सचिव सौ. लक्ष्मी कवळे यांनी नव्या सदस्यांचे स्वागत करताना सांगितले की, "संस्थेच्या माध्यमातून सर्वसामान्य ग्राहकांना न्याय मिळवून देणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे. नव्या सदस्यांच्या सहभागामुळे हे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेले जाईल." नवीन सदस्यांनीही संस्थेच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवण्याची तयारी दर्शवली आहे. ग्राहकांच्या हक्कांसाठी लढा देत समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या उपक्रमामुळे दक्षिण मध्य मुंबई जिल्ह्यात लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेची पकड अधिक मजबूत होणार असून, भविष्यात अधिक व्यापक स्तरावर कार्य विस्तार करण्याचा संस्थेचा मानस आहे.

### पुढील वाटचालीला गती मिळणार

नव्या सदस्यांच्या सहभागामुळे संस्थेच्या पुढील वाटचालीला गती मिळणार असून, ग्राहक संरक्षणाच्या क्षेत्रात ही चळवळ अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.